**गैरअर्जदार यांच्या तर्फे साक्षीदार क्र. ०२ यांचा शपथेवर उलटतपास अर्जदारातर्फे विधिज्ञ सौ.पी.एस. कुलकर्णी यांच्या मार्फत शपथेवर सुरू:–**

हे म्हणणे बरोबर आहे की, अनुराधाच्या वडीलांनी आमच्या गावी तिचे व माझ्या मुलाचे लग्न लावून दिले. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार नांदायला आली त्यावेळी आम्ही आमच्या सर्व सुना एकत्र राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार यांना काही दिवस नीट नांदवले व त्यानंतर त्रास द्यायला सुरुवात केली. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिच्याकडे लॉण्ड्री टाकण्यासाठी एक लाख रुपयाची मागणी करु लागलो. हे म्हणणे खरे नाही की, एक लाख रुपयाच्या मागणीसाठी मी व माझ्या सुनांनी अर्जदार हीला मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, एक लाख रुपये अर्जदार यांच्या माहेरच्या लोकांनी दिले नाही म्हणून आम्ही त्रास देत असल्यामुळे अर्जदारच्या भावाने तिला व रवीला उदगीरला आणून पन्नास हजार खर्चून लॉण्ड्रीचे दुकान टाकून दिले. हे म्हणणे खरे नाही की, रवि लॉण्ड्री चालवायचा अर्जदार ही धुंणे–भांडी करायची. हे म्हणणे खरे नाही की, एक लाख रुपये दिले नाही तर रवीचे दुसरे लग्न लावण्याची धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही रवी चे लग्न नंतर देवकी सोबत लावून दिले.

आमचे मुळ गाव आंध्रप्रदेश येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला तिथे शेती नाही. आंध्रप्रदेश येथे खडकाळ जमीनचे रान आहे. आम्ही सर्वजण कोठा येथे राहतो. कोठयाला मी व रवी राहतो. रवि, मी व माझे पती असे एकत्र राहतो. हे म्हणणे खरे नाही की, कोठा येथे मी माझे पती, रवि, देवकी व त्यांचा मुलगा वेदांत असे राहतो. हे म्हणणे खरे नाही की, २०२३ ला तडजोड झाली. दोन लाख रुपयाचे देण्याचे ठरले त्यापैकी एक लाख रुपये दिले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की,

अर्जदार ही घरातून दोन तोळे सोने आणि वीस हजार रुपये घेवून पळून गेली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिने आमच्या विरुध्द ४९८ ची केस केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही दहा ते पंधरा हजार महिणा कमाविते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे पती रवी सोबत राहते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

फेर तपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.07.28 17:37:42 +0530

**न्यायदंडाधिकारी प्र.व.**

**दिनांकः– २८.०७.२०२६** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**